**अतितात्काळ / कालमर्यादा**

क्र. पोमसं/३/मत्ता व दायित्वे /३६४/ २०१४ मुंबई दि.२०/१०/२०१५

विषय :- पोलीस सेवेतील पोलीस निरीक्षक ते पोलीस उप-निरीक्षक दर्जाच्या अधिका-यांनी मत्ता व दायित्व विवरणपत्रें सादर करण्याबाबत.

***

सोबत, परिपत्रक क्र. पोमसं/३/मत्ता व दायित्वे /३६४/२०१२-२०१४ /४३८/२०१४ दि.२०/०१/२०१४ व शासन निर्णय, गृह विभाग, क्र.एम्आयएस्-०६१३/प्र.क्र.२६०/पोल-५ब, दि.२९/११/२०१३ जोडले आहेत. तरी सदरचे आदेश व शासन निर्णय www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर कृपया सत्वर प्रसिध्द करावेत. सदरचे आदेश हे या कार्यासनाचे पुढील आदेश होईपर्यंत वेबसाईटवर ठेवण्यात यावेत.

( पं.कि.घुगे ) २३/१०/१५

पोलीस महानिरीक्षक यांचे वरिष्ठ उप सहायक(आस्था-१)

पोलीस महासंचालक यांचे करिता.

प्रति,

पोलीस निरीक्षक,
संगणक कक्ष, म.राज्य, मुंबई

D:\Admin\Documents\PM\website letter.doc

**तात्काळ**

क्र.पोमसं/३/मत्ता व दायित्वे/३६४ /२०१२ मुंबई, दिनांक :- २०/०१/२०१४

विषय :- पोलीस सेवेतील **पोलीस निरीक्षक ते पोलीस उप-निरीक्षक दर्जाच्या अधिका-यांनी मत्ता व दायित्वे विवरण सादर करण्याबाबत.**

-----o-----

सोबत शासन गृह विभाग, निर्णय क्र.एमआयएस-०६१३/प्र.क्र.२६०/पोल-५ब, दि.२९/११/२०१३ ची प्रत जोडली आहे. सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी दि.३१/१२/२०१३ रोजी त्यांचे कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या **पोलीस निरीक्षक ते पोलीस उप-निरीक्षक** दर्जाच्या अधिका-यांकडून शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीडीआर-१०८५/२५७९/४६/अकरा, दि.१५/०७/१९८६ सोबत जोडलेल्या प्रपत्र क्र.एक, दोन व तीन प्रपत्रांमध्ये [ म्हणजे (अ) स्थावर मालमत्तेचे विवरणपत्र, (ब) जंगम मालमत्तेचे विवरण आणि (क) कर्जे व इतर दायित्वे ] ३ प्रतीत प्राप्त करुन घेऊन त्यापैकी दोन प्रती पोलीस महासंचालक यांना सादर करावयाच्या असून, एक प्रत त्यांच्याकडील गोपनीय अभिलेखावर गोपनीय स्वरुपात ठेवावी व सदर पोलीस अधिकारी ज्या घटकात बदलून जाईल त्या घटक प्रमुखांना त्या पोलीस अधिका-याने मत्ता व दायित्व विवरणपत्र सादर केले असल्याबाबत / केले नसल्याबाबतची माहिती कळविण्यात येईल. अशाप्रकारे प्रत्येक पोलीस अधिका-याचे मत्ता व दायित्व विवरणपत्राची यापुढील प्रत्येक वर्षाची वर्षनिहाय माहिती त्या त्या संबंधित पोलीस घटकप्रमुखांकडे सोबतच्या सहपत्रामध्ये अद्ययावत ठेवली जाईल.

२. राज्य पोलीस सेवेतील पोलीस निरीक्षक ते पोलीस उप-निरीक्षक दर्जाच्या प्रत्येक पोलीस अधिकारी त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या वेळी सादर करण्यात आलेल्या विवरणाच्या नंतर, तसेच राज्य पोलीस सेवेतील पोलीस निरीक्षक ते पोलीस उप-निरीक्षक दर्जाचा जो पोलीस अधिकारी सेवेत आहे तो देखील, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सीडीआर १०८५/२५७९/४६/अकरा, दि.१५/०७/१९८६ सोबत जोडलेल्या प्रपत्र एक व दोन यामध्ये **दरवर्षी त्यांच्या मत्तेबाबतचे ३१ डिसेंबर रोजीचे विवरण, पुढील वर्षाच्या ३१ मार्च रोजी किंवा तत्पूर्वी सादर करील.** तथापि, त्यांच्या कुटंबातील सदस्यांच्या बाबतीत, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम १९(४) अन्वये सदर विवरणे स्वतंत्र आदेशांव्दारे मागविल्याखेरीज, सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

३. **उपरोक्त शासन गृह विभाग, निर्णय दि.२९/११/२०१३ मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित पोलीस अधिका-यांकडून विहित कालावधीत मत्ता व दायित्वाबाबत विवरणपत्रे सादर न करणे ही गैरवर्तणुक आहे. अशा अधिका-यांच्या गैरवर्तणुकीबद्दल महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपील) नियम, १९५६ च्या तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात यावी.**

४. तरी, सर्व पोलीस घटकप्रमुखांनी, सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने त्यांच्या घटकामध्ये कार्यरत असलेल्या पोलीस निरीक्षक ते पोलीस उप-निरीक्षक दर्जाच्या अधिका-यांची मत्ता व दायित्वाची विवरणपत्रे प्राप्त करुन घेऊन ती पदनिहाय व स्वतंत्र पत्राव्दारे **(नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांचे बाबतीत कार्यासन क्र.३, सशस्त्र / राखीव/ पो.बिनतारी संदेश /मोटार परिवहन विभाग इ. संवर्गाचे पोलीस निरीक्षकांचे बाबतीत कार्यासन क्र.३-अ, सहा.पोलीस निरीक्षकांचे बाबतीत कार्यासन क्र. ४, नि:शस्त्र पोलीस उप-निरीक्षकांचे बाबतीत कार्यासन क्र.५ व सशस्त्र /राखीव /पो.बिनतारी संदेश /मोटार परिवहन विभाग इ. संवर्गाचे पोलीस उप-निरीक्षकांचे बाबतीत कार्यासन क्र.५-अ** यांना

**लक्षवेध करुन )** या कार्यालयास दि.१०/०४/२०१४ पुर्वी पाठविण्यात यावीत. ज्या पोलीस अधिका-यांनी विवरणपत्रे सादर केली आहेत त्यांची नांवे व ज्या पोलीस अधिका-यांनी विवरणपत्रे सादर केली नाहीत त्यांच्या विरुध्द करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबतचा सविस्तर अहवाल घटकप्रमुखांनी दि.३०/०४/२०१४ पर्यंत या कार्यालयास सादर करावा. अशाप्रकारे प्रत्येक वर्षी कार्यवाही करण्याबाबत घटकप्रमुखांनी दक्षता घ्यावी.

**( डॉ.बी.के.उपाध्याय )**
विशेष पोलीस महानिरीक्षक(आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरीता.

प्रति,

महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, म.रा., मुंबई (सस्नेह)
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अवेषण विभाग, म.रा., पुणे.
अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण /प्रशिक्षण व खास पथके / लोहमार्ग / वाहतूक म.रा., मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबईसह)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / मोटार परिवहन, पुणे / संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे / नक्षल विरोधी अभियान, नागपूर /विशेष सुरक्षा विभाग, दादर, मुंबई.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली.

**प्रत आवश्यक त्या सत्वर कार्यवाहीकरिता.**

सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग, मुंबई सह),
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये / (अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र), नागपूर
उप संचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण शाळा, नाशिक.

**प्रत सस्नेह अग्रेषित.**

संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८ क्वीस गार्डन, पुणे.
संचालक, समाजकल्याण संचालानलय, म.रा.,पुणे.
उप संचालक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद / नागपूर / अमरावती / नंदुरबार / गडचिरोली.
उप संचालक, समाजकल्याण अधिकारी, ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद / नागपूर / अमरावती.

**प्रत समान कार्यवाहीकरिता,**

पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.१-अ, २ व ३-अे, ४, ५ व ५-अ

२/- कार्यासन क्र.३-अ, ४, ५ व ५-अ यांनी सदर परिपत्रकीय ज्ञापनातील परि.४ /टि. नुसार त्यांचे संबंधीत माहितीकरीता घटकांकडे परस्पर पाठपुरावा करावा.

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, गृहविभाग,
मंत्रालय, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-वन, कफ परेड,
मुंबई- ४००००५. / पोल-१अ

# प्रपत्र-अ

## दि.३१/१२/२०१३ अखेर पोलीस सेवेतील नि:शस्त्र पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिका-यांचा मत्ता व दायित्वे विवरणपत्राबाबतचा घटकनिहाय तपशील.

**घटकप्रमुख :-**

**एकुण मंजूर पदे :-**

| अ.क्र. | पो.अधिका-याचे नांव | पदनाम | मत्ता व दायित्वाबाबतचे विवरणपत्राचा कालावधी | सिलबंद लखोटयात दोन प्रतीमध्ये सादर केले किंवा कसे ? | विवरणपत्र सादर केले नसल्यास त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र पोलीस (शिक्षा च अपील) नियम. १९५६ च्या तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात आली आहे किंवा कसे ? |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |